# लातूर भूकंप

सांज दैनिक : शनिवार – २३ सप्टेंबर २०२३

वर्ष – ३७ वे

अंक – १७०

पाने – ४

किंमत २ रूपये

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

epaper.dainikbhukamp.com



लातूर - नाशिक

दररोज

रात्री ८.३० वाजता

GET IT ON Google Play

VISHWA TRAVELS APP

विश्व ट्रॅव्हल्स

२, उद्योग भवन कॉम्प्लेक्स, शिवाजीनगर, लातूर.

संपर्क : (02382) 242790, 254002, 249329, 88888 45403, 88888 45404.

जिथं प्रवासाची व्याख्याच बदलते

Online Booking : www.vishwatravels.in




## नागपुरात पूरसदृश्य परिस्थिती; आतापर्यंत ५०० लोकांची सुटका

नागपूर : नागपूरमध्ये गुरुवारपासून पावसाची सततधार सुरू असून आज दि. २३ सप्टेंबर अवघ्या ४ तासांत १०० मिमी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे अंबाझरी तलाव ओव्हरफ्लो झाला असून सखल भागात पाणी शिरल्यामुळे पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या एनडीआरएफ आणि एसडीआरएफचे पथक बचावकार्यासाठी पोहचले असून आतापर्यंत सुमारे ५०० लोकांना वाचवण्यात यश आले आहे.

# पोलीस ठाण्यातच गार्डने डोक्यात गोळी झाडून घेतली

लातूर : लातूर येथील गांधी चौक पोलीस ठाण्यात लॉकअप गार्ड म्हणून कर्तव्यावर असलेले पोलीस जमादार पांडुरंग शंकरराव पिटले (वय ४९) यांनी काल रात्री बंदुकीतून (एसएलआर) डोक्यात गोळी झाडून घेतली आहे. पिटले यांची प्रकृती गंभीर असून त्यांना लातूर येथील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असल्याचे वृत्त आहे.

पांडुरंग शंकरराव पिटले हे पोलीस जमादार काही महिन्यापासून लातूरच्या गांधी चौक पोलीस ठाण्यातील लॉक अप समोर गार्ड म्हणून कर्तव्य बजावत होते. ते मनमिळाऊ, बोलक्या स्वभावाचे असले तरी त्यांनी स्वतःजवळील शासकीय एसएलआर मधून स्वतःच्या डोक्यात गोळी का झाडून घेतली हे प्रश्नचिन्ह आहे. पिटले यांनी शुक्रवार, दि. २२ सप्टेबर रोजी रात्री पावणेदहा ते दहा वाजण्याच्या सुमारास लॉकअप समोर ड्युटीवर असताना बंदुकीतून स्वतःच्या डोक्यात गोळी झाडून घेतली आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते.

घटनेचे वृत्त कळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटनास्थळाला भेट दिली. ते बरे व्हावेत म्हणून त्यांना तातडीने लातूर येथील एका खासगी रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती आज दुपारपर्यंत चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांनी स्वतःच्या डोक्यात गोळी का मारून घेतली हे अद्याप स्पष्ट झाले नाही.

# विमा कंपनीत खळ्ळ्खट्याक दीड महिन्यानंतर ७ जणांवर गुन्हा

लातूर : दुष्काळ पडला असताना, तुम्ही तुमचे कार्यालय बंद का ठेवता? शेतकऱ्यांसाठी तुम्ही काय करता असे जनरल इन्शुरन्स लि. कंपनीच्या लातूर शाखेत जाऊन तेथे उपस्थित कर्मचाऱ्यास लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून कार्यालयातील खुर्च्या, टेबलची नासधूस केली होती.

लातूर परिसरात दुष्काळ आहे. शेतकऱ्यांची पिके वाळू लागली आहेत. शेतकरी पीक नुकसानीबाबत चौकशी करण्यासाठी एसबीआय जनरल इन्श्युरन्स कंपनी लि. च्या गिरवलकर नगर, लातूर येथील कार्यालयात येतात पण हे कार्यालय सतत बंदच राहते. या कारणावरून मनसेचे रवि सुर्यवंशी, संतोष नागरगोजे, भागवत शिंदे व इतर कार्यकर्ते यांनी कार्यालयात जाऊन उपस्थित कर्मचाऱ्यास जाब विचारला, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून टेबल, खुर्च्यांचे २ हजार रूपयांचे नुकसान केले.

ही घटना ९ ऑगस्ट २०२३ रोजी घडली होती. लातूरच्या एमआयडीसी पोलिसांत गुन्हा मात्र काल २२ सप्टेबर रोजी रात्री १० वाजता दाखल करण्यात आला आहे. सुशिलकुमार सुरेशचंद्र तिवारी रा. उत्तरप्रदेश हा. मु. हॉटेल ग्रँड यांच्या फिर्यादीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जलसाक्षरता रॅलीत काळे झेंडे दाखवल्याचा निषेध पाणी प्रश्न सुटेपर्यंत छावा निलंगेकरांच्या पाठीशी

लातूर : लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी माजी पालकमंत्री मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्यात जलसाक्षरता अभियान राबविले जात आहे. या अभियानादरम्यान अहमदपूर येथे त्यांच्या या अभियान रॅलीस काळे झेंडे दाखविण्याची दुर्दैवी घडली. त्याचा आपण तीव्र शब्दांत निषेध करतो, असे सांगून अखिल भारतीय छावा संघटनेचे अध्यक्ष नानासाहेब जावळे पाटील यांनी पाणी प्रश्नाची सोडवणूक होईपर्यंत आपली संघटना आ. निलंगेकरांसोबत काम करणार असल्याची माहिती पत्रकारांशी बोलताना दिली.

आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या जलसाक्षरता अभियानास लातूर जिल्ह्यात सर्वत्र अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. असे असतानाच अहमदपूरमध्ये शुक्रवारी काही स्वार्थी प्रवृत्तीच्या राजकीय मंडळींनी आपल्या समर्थकांकरवी या अभियानादरम्यान काळे झेंडे दाखविण्याचा निंदनीय प्रकार केला. पाण्याच्या प्रश्नावरून आजपर्यंत एकही मराठा नेत्याने रस्त्यावर उतरण्याचे धारिष्ट्य दाखविले नव्हते. पाणी प्रश्न हा मुळात मराठा वा अन्य कोणत्याही एका समाजाशी संबंधित नसून तो शेतकऱ्यांशी संबंधित आहे. शेतकऱ्यांशी निगडित असणाऱ्या या प्रश्नाबद्दल रस्त्यावर उतरणाऱ्या आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचे आपण सर्वप्रथम अभिनंदन करतो, असे सांगून नानासाहेब जावळे पाटील पुढे म्हणाले की, या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सगळ्याच राजकीय नेत्यांनी एकत्रित येणे काळाची गरज आहे. आ. निलंगेकरांच्या बरोबरीने पुढे येणे आवश्यक आहे. मात्र असे न होता त्यांच्या अभियानात अडथळा आणण्यासाठी असे भ्याड कृत्य करवून घेतले जात आहे. असा प्रकार आम्हीच काय, कोणीही सहन करणार नाही.



आजपर्यंत विविध राजकीय नेत्यांनी पद , सत्तेचा स्वार्थासाठी वापर करून घेण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी कोणीही पोटतिडकीने पुढे येताना दिसत नाही. आ. निलंगेकरांनी हाती घेतलेले हे अभियान खरोखरच अभिनंदनीय आहे. त्यामुळे या प्रश्नाची सोडवणूक होईपर्यंत छावा संघटना निलंगेकरांसोबत कार्यरत राहणार आहे. यापुढे असा भ्याड प्रकार घडल्यास तसे करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना त्याच झेंड्याने बदडून काढण्याचे काम छावा संघटना केल्याशिवाय राहणार नाही,असा सज्जड इशाराही जावळे पाटील यांनी यावेळी दिला . या भ्याड प्रकाराच्या माध्यमातून कोणीही आपली राजकीय पोळी भाजून घ्यायचा प्रयत्न करू नये असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

याप्रसंगी छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष दीपक नरवडे, संपर्क प्रमुख आकाश पाटील, रेणापूर तालुका अध्यक्ष बाजीराव टेकुगे, जिल्हासंघटक अंकुश शेळके, निलंगा तालुका अध्यक्ष दास साळुंके, लातूर तालुका अध्यक्ष समाधान जाधव, गोपाळ चाळक, शिवशंकर सूर्यवंशी, सुदर्शन ढमाले यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# रोहित पवारांसह सर्वजण मंत्रीमंडळात जायला तयार होते-भूजबळ

नाशिक : अजित पवार गटातला एकही माणूस असा नाही, जो ब्लॅकमेल करेल. काहीही आपलं बोलायचं, उलट रोहित पवार आणि सगळ्यांनी मंत्रीमंडळात जायचं, असा निर्णय घेत या पत्रावर सह्या केल्या असल्याचा दावा मंत्री छगन भुजबळ यांनी केला. विरोधी पक्षात असल्यावर हे बोलायला पाहिजे, नाहीतर विरोधी पक्षाचे आमदार म्हणून कसं सिद्ध होईल? यासाठी हा खटाटोप असल्याचे वक्तव्य देखील छगन भुजबळ यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी पक्षातील संघर्ष चव्हाट्यावर आला आहे. अजित पवार यांच्यासह इतर आमदार सत्तेत सहभागी झाल्यानंतर राष्ट्रवादीत उभी फूट पडली. शरद पवार गट आणि अजित पवार गट असे दोन गट निर्माण झाले. त्यानंतर अनेक घडामोडी समोर आल्या. मात्र गेल्या काही दिवसात रोहित पवार आणि अजित गटातील नेत्यांचा संघर्ष टोकाला गेल्याचे पाहायला मिळत आहे. शरद पवार गटाचे एक आमदार आणि खासदार अजित पवार गटात जाण्याबाबत रोहित पवारांनी गंभीर आरोप केले. काही नेत्यांचा ब्लॅकमेलिंग सुरू आहे तू सही कर नाहीतर काम होणार नाही, असं कदाचित सांगितलं जात असा आरोप रोहित पवार यांनी केला. यावर भुजबळ यांनी रोहित पवार यांचा समाचार घेत मंत्रिमंडळात जाण्यासाठी रोहित पवार यांच्यासह सगळ्यांच्या सह्या पत्रावर करण्यात आल्या होत्या, असा गौप्यस्फोट भुजबळांनी केला आहे.

## त्यांच्या मते....

▣ राज्यात सध्या तीन टग्यांचे राज्य चालू आहे.

– आ. विजय वडेट्टीवार

☛ विरोधी पक्ष नेतेपद मिळाल्यापासून भाषा बदललीय का?

▣ सत्तेत वेड्याचं सरकार बसलेलं आहे. या सरकारला जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही.

–आ. नाना पटोले

☛ कोण वेडं, कोण शहाणं, हे ठरविण्याची वेळ आता जनतेवर आली आहे.

▣ अजितदादा पवार यांच्याही अगोदर आ. रोहित पवार यांनी भाजपासोबत जाण्यासाठी आग्रही भूमिका घेतली होती.

– आ. सुनील शेळके

☛ तुम्ही पवारांच्या किचन कॅबीनेटमधील असाल तर हे खरे असू शकते.

▣ कितीही जन्म घेतले तरी रोहित पवार हे अजित पवार होऊ शकणार नाहीत.

– खा. सुनील तटकरे

☛ काही झालं तरी अजित पवार हे शरद पवार होऊ शकत नाहीत, असं आम्ही ऐकत आहोत.

# रिया गायकवाड अमेरिकेतील विद्यापीठात सिनेट निवडणुकीत विजयी



न्यूयॉर्क : लातूर चे माजी खासदार प्रा. डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांची पुतणी रिया विजयकुमार गायकवाड ही अमेरिकेच्या न्यूयॉर्क येथील बफेलो यूनिवर्सिटी मध्ये बॅचलर ऑफ बायोमेडिकल च्या पहिल्या वर्षात शिक्षण घेत आहे. विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत रिया विजयकुमार गायकवाड ही प्रचंड मतानी विजयी झाली आहे. बारा सदस्या साठी निवडणूक झाली होती. या बारा मधे भारतीय दोन विद्यार्थी आहेत. त्यात रिया गायकवाड ही निवडून आली आहे. तिच्या निवडीबद्दल तिचे कौतुक होत आहे.

लातूर च्या वाले इंग्लिश मीडियम मधे प्राथमिक आणि हायस्कूल चे शिक्षण घेतली असून,वर्गामध्ये नेहमी पाहिली येणारी विद्यार्थीन होती.ती कॉलेज ला शिकत असताना रोटरी च्या माध्यमातून सोशल वर्क केली आहे. काहीतरी वेगळे शिक्षण घेतले पाहिजे म्हणून भविष्यात ज्या शिक्षणाची गरज भासणार आहे असे बायोमेडिकल शिक्षण निवडले आणि जगातली सर्वात चांगली बफेलो यूनिवर्सिटी मधे तिने आपल्या बुद्धिच्या जिवावर प्रवेश मिळवला. आणि लातूर ची मुलगी सात समुद्रापार आपले नेतृत्व आता विद्यापाठाच्या सिनेटवर करणार आहे. रिया गायकवाड ही भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या सोबत चळवळीत काम केलेले आदर्श शिक्षक बळीराम शिवराम गायकवाड यांची नात आणि समृद्धी महामार्ग चे तांत्रिक प्रमुख एमएसआरडीसी चे सह महाव्यवस्थापकीय संचालक डॉ अनिलकुमार बळीराम गायकवाड आणि लातूरचे माजी खा. प्रा. डॉ. सुनील बळीराम गायकवाड यांची पुतणी आहे.

रिया गायकवाड हिच्या या यशानंतर त्यांचे कुटुंबीय, मित्र परिवार यांच्याकडून रिया व तिचे वडील विजयकुमार गायकवाड यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# १५ हजार शाळा बंद करण्यासंदर्भात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा-नाना पटोले

मुंबई : कमी पटसंख्येच्या नावाखाली जिल्हा परिषद शाळा बंद करण्याच्या हालचाली मनुवादी भाजपा सरकारने सुरु केल्या आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार मुलांना घरापासून जवळ शिक्षण उपलब्ध करुन देणे हे सरकारचे कर्तव्य आहे परंतु २० किलोमीटरच्या परिसरातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद करुन एकच शाळा सुरु ठेवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. सरकारचा हा निर्णय बहुजन समाजातील मुलांना शिक्षणांपासून वंचित ठेवणारा असून पटसंख्येच्या नावाखाली राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद कराल तर याद राखा, असा खणखणीत इशारा महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

शाळा बंद करण्यावर भाजपा सरकारचा समाचार घेताना कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, कमी पटसंख्येचे कारण देत सरकार जिल्हा परिषदेच्या जवळपास १५ हजार शाळा बंद करुन समुह शाळा सुरु करणार असल्याच्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. या शाळांमधून १ लाख ८५ हजार विद्यार्थी शिकत आहेत तर २९ हजारांपेक्षा जास्त शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षणाची गंगा वाड्या वस्त्यापर्यंत पोहचावी यासाठी राज्यातील अनेक महापुरुषांनी शाळा सुरु केल्या. पण हे सरकार गरिब, मागास, वंचित समाजातील मुलांना शिक्षणापासून दुर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. गाव व वस्तीवरील शाळा बंद केल्यास दुर शिक्षण घेण्यासाठी लहान मुलांना पायपीट करावी लागेल. वाहनाची व्यवस्था ग्रामीण, दुर्गम भागात नाही अशा परिस्थितीत २० किलोमीटरच्या क्षेत्रात एकच शाळा ठेवण्याचा निर्णय निर्बुद्धपणाचा व कसलाही विचार न करता घेतलेला दिसत आहे.

समुह शाळांचा प्रयत्न यापूर्वीही केला होता पण तो अपयशी ठरला आता पुन्हा नवीन शैक्षणिक धोरणात समुह शाळेचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे १५ हजार शाळा बंद होऊन या शाळांमध्ये शिक्षण घेणारे सामान्य कुटुंबातील मुले-मुली शिक्षणांपासून वंचित होतील. खाजगी महागडे शिक्षण ग्रामीण, दुर्गम व वाड्या वस्त्यांवरील मुलांना परवडणारे नाही. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी यासंदर्भात तातडीने खुलासा गरणे गरजेचे आहे. याप्रश्नी कॉँग्रेस आवाज उठवेल व गरिबांच्या मुलांचा शिक्षणाचा हक्क हिरावून घेऊ देणार नाही, असेही नाना पटोले यांनी स्पष्ट केले.



## तलवार, एअरगनसह युवकास अटक

विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर व त्यांच्या पथकाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे हद्दीत तेथील पोलीस अधिकाऱ्यांना सोबत घेवून निलेश सत्यवान मादळे रा. ५ नं. चौक बार्शी रोड, लातूर यास ताब्यात घेवून त्याच्याकडून तलवार व एअरगन जप्त केली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली त्या तरूणाच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# टीम इंडियाने सामना तर जिंकला, पण ३ खेळाडूंनी दिले मोठे टेन्शन, वर्ल्ड कपमध्ये होऊ शकते मोठं नुकसान

भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेला अतिशय सोप्या आणि दमदार विजयाने सुरुवात केली. ही एकदिवसीय मालिका विश्र्वचषकापूर्वी खेळवली जात असली, तरी याकडे केवळ सराव म्हणून पाहिले जात असले, तरी संघ व्यवस्थापनासाठी आणि विशेषत: काही खेळाडूंसाठी या मालिकेला आणखी काही अर्थ आहे. अशा परिस्थितीत या मालिकेच्या कामगिरीकडे सर्वांच्या नजरा आणि अपेक्षा आहेत. मोहालीत टीम इंडिया या अपेक्षांवर खरी उतरली. निदान विजयाच्या दृष्टीने तरी, पण तीन खेळाडूंची कामगिरी निश्र्चितच वेगळ्या प्रकारच्या तणावाचे कारण ठरली.

मोहाली येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडिया आपला नियमित कर्णधार रोहित शर्मा, स्टार फलंदाज विराट कोहली आणि काही प्रमुख खेळाडूंशिवाय गेला होता. या खेळाडूंना पहिल्या आणि दुसऱ्या वनडेसाठी विश्रांती देण्यात आली आहे. अशा परिस्थितीत या दिग्गज खेळाडूंशिवाय संघाची कामगिरी




कशी होईल, हे पाहायचे आहे. याशिवाय विश्र्वचषक संघात निवड झालेले खेळाडू स्वत:ला योग्य दाखवतात की नाही हेही पाहायचे होते. बहुतांश आघाड्यांवर संघ मजबूत दिसत होता. तरीही तीन खेळाडू वेगवेगळ्या कारणांमुळे अडचणीचे ठरले आहेत.

सर्वप्रथम शार्दुल ठाकूरबद्दल बोलूया. मध्यमगती गोलंदाजीसह विकेट घेण्याच्या क्षमतेमुळे शार्दुल आधीच प्रसिद्ध झाला आहे आणि २०१९ विश्र्वचषकानंतर एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज आहे. खालच्या क्रमाने फलंदाजीसह तो उपयुक्त योगदानही देऊ शकतो. या सर्व गुणांमुळे शार्दुलला प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान दिले जात असले, तरी त्याच्यासाठी मोहम्मद शमीला बाहेर बसावे लागते.

मात्र गेल्या काही सामन्यांमध्ये त्याची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. मोहालीतही तो पूर्णपणे कुचकामी दिसला आणि तो सर्वात महागडा ठरला. त्याने १० षटकात ७८ धावा दिल्या आणि एकही विकेट घेतली नाही. अशा स्थितीत आघाडीच्या वेगवान गोलंदाजाच्या जागी शार्दुलचा समावेश करणे योग्य ठरेल का, असा प्रश्र्न उपस्थित होत आहे.

शार्दुलची कामगिरी खराब होती, तर मोहम्मद शमीने आपल्या जबरदस्त कामगिरीने टीम इंडियासमोर प्रश्र्न उपस्थित केले आहेत. संघाच्या फलंदाजीतील खोलीमुळे शार्दुलला प्लेइंग इलेव्हनमध्ये सतत संधी मिळत होती आणि अशा स्थितीत शमीला आशिया कपदरम्यान बाहेर बसावे लागले. शमीला जेव्हा जेव्हा संधी मिळाली, तेव्हा त्याने अप्रतिम कामगिरी केली. मोहालीमध्ये शमीने १० षटकांत ५१ धावा दिल्या आणि सर्वाधिक ५ बळी घेतले. आतापर्यंत टीम इंडिया फक्त जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांना संधी देत आहे, पण शमीच्या अशा कामगिरीनंतर त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे कितपत योग्य आहे? ही चूक टीम इंडियाला वर्ल्ड कपमध्ये महागात पडू शकते का?

शेवटी, या सामन्यात कर्णधार असलेल्या केएल राहुलबद्दल बोलूया. दुखापतीनंतर संघात परतलेला केएल राहुल सतत धावा करत आहे. राहुलने आशिया चषक स्पर्धेत शानदार फलंदाजी केली आणि मोहालीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध ५८ धावांची नाबाद खेळी करत संघाला विजय मिळवून दिला. तरीही राहुलने टेन्शन दिले असून त्याचे कारण त्याचे विकेटकीपिंग आहे. टीम इंडिया राहुलला कीपिंग करायला लावत आहे आणि आशिया कप दरम्यान, तो या कामात चांगला दिसत होता, पण मोहालीमध्ये त्याची समस्या स्पष्टपणे दिसून आली.

अलिकडच्या वर्षांत यष्टिरक्षणात यापेक्षा वाईट कामगिरी क्वचितच झाली आहे. राहुलने केवळ झेल आणि धावबाद करण्याची संधी गमावली नाही, तर सोपे चेंडू पकडण्यातही चुका केल्या. लाथ मारल्यानंतर तो चेंडूही पकडू शकला नाही आणि यादरम्यान त्याच्या अंगठ्यालाही दुखापत झाली. अशा स्थितीत विश्र्वचषकात संघ त्याच्यावर विश्र्वास ठेवू शकतो का? हा मोठा प्रश्र्न असेल.

# एमएनसीला कोणत्या जागतिक संस्थेची मिळाली मान्यता? वैद्यकीय विद्यार्थ्यांना कसा होईल याचा फायदा ते जाणून घ्या

जागतिक वैद्यकीय शिक्षण महासंघाने (थऋचए) राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाला (छचउ) मान्यता दिली आहे. ही ओळख महत्त्वाची आहे, कारण ती वैद्यकीय शिक्षण आणि प्रशिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याला मान्यता देते. हे आयोग आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करत असल्याचे सूचित करते. वर्ल्ड फेडरेशन फॉर मेडिकल एज्युकेशनची स्थापना १९७२ मध्ये जागतिक आरोग्य संघटना, वर्ल्ड मेडिकल असोसिएशनने केली. याचा भारतातील वैद्यकीय विद्यार्थ्यांना कसा फायदा होईल ते जाणून घेऊया.

ही संस्था जगभरातील वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा वाढवण्यासाठी काम करते. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून मिळालेल्या या मान्यतेचा लाभ देशातील सर्व ७०० हून अधिक वैद्यकीय महाविद्यालयांनाही मिळणार आहे. या सर्वांना आपोआपच जागतिक वैद्यकीय शिक्षण महासंघाची मान्यता मिळाली. येत्या दहा वर्षांत उघडणाऱ्या सर्व वैद्यकीय महाविद्यालयांना ही मान्यता आपोआप मिळणार आहे. या मान्यतेचा फायदा त्या वैद्यकीय विद्यार्थ्यांनाही मिळणार आहे, ज्यांना पीजी करून देशाबाहेर प्रॅक्टिस करायची आहे. आता ते अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड इत्यादी जगातील प्रमुख देशांतील प्रमुख वैद्यकीय संस्थांमधून सहज शिक्षण घेऊ शकतील.

वर्ल्ड फेडरेशन फॉर मेडिकल एज्युकेशनच्या मान्यतेमुळे देशात कार्यरत वैद्यकीय संस्थांची तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर वैद्यकीय व्यावसायिकांची प्रतिष्ठा वाढेल. यानंतर वैद्यकीय संस्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावरून शैक्षणिक सहकार्य सहज मिळू शकेल. भारतीय संस्थाही इतर देशांच्या मदतीसाठी सहज पुढे येऊ शकतील. अशाप्रकारे वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवीन खिडकी उघडली आहे, जी एकमेकांकडून शिकण्यास आणि शिकवण्यास मदत करेल. या मान्यतेमुळे परदेशी विद्यार्थीही भारतीय वैद्यकीय संस्थांमध्ये शिक्षण घेण्यासाठी येतील. ही ओळख त्यांना आकर्षित करेल.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाची स्थापना संसदेने पारित केलेल्या कायद्याद्वारे करण्यात आली आहे. हे राष्ट्रीय वैद्यकीय आयोग कायदा २०१९ म्हणून ओळखले जाते. ही देशातील वैद्यकीय शिक्षणाची सर्वोच्च संस्था आहे. नवीन आणि जुन्या वैद्यकीय संस्था या आयोगाशी संलग्न आहेत. सरकारी, खासगी आणि सर्व वैद्यकीय संस्थांना आयोगाची मान्यता मिळणे बंधनकारक आहे. कोणतीही वैद्यकीय संस्था ओळखल्याशिवाय चालवणे हा दंडनीय गुन्हा आहे. हाच आयोग वैद्यकीय व्यावसायिकांनाही मान्यता देतो.

# आरोग्यदायी राळा पीक




यंदाचे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. यंदाच्या वर्षातील प्रत्येक महिना एका तृणधान्यासाठी समर्पित केला आहे. सप्टेंबर महिना 'राळा' या तृणधान्यासाठी समर्पित केला आहे. राळ्याला पारंपारिक महत्त्व असते. या महिन्यात धार्मिक कार्य केले जातात. यासाठी 'राळा' अतिशय महत्त्वाचा आहे. आरोग्यदृष्ट्याही राळा या तृणधान्याला महत्त्व आहे.

'राळा' पिकाचे महत्त्व : राळ्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवते. अर्धशिशी, निद्रानाश, कॉलरा, ताप यांच्या उपचार पद्धतीमध्ये राळ्याचा प्रामुख्याने वापर केला जातो. राळ्याचा अँटिऑक्सिडण्ट हा गुणधर्म रोगप्रतिकारशक्ती वाढवतो. लोहाचे प्रमाण जास्त असल्याने मेंदूला ऑक्सिजन पुरवठा सुरळीत ठेऊन मेंदूची कार्यक्षमता वाढवते. मोड आलेले राळा खाल्यास हाडांचा ठिसूळपणा कमी होऊन हाडे बळकट होतात. मधुमेह आणि पोटाच्या आजारांवर 'राळा' हे पौष्टिक अन्न म्हणून उपयुक्त आहे.

राळा (Foxtail millet) : पिकाची ओळख, महत्व व सुधारित लागवड तंत्रज्ञान

राळा (Foxtail millet) हे गवतवर्गीय कुळातील पीक असून या पिकाचे शास्त्रीय नाव Setaria italica (L). Beauv असे आहे. या पिकाची धान्य व तसेच चारा म्हणून आशिया, आफ्रिका व अमेरिका खंडात लागवड केली जाते. या पिकाचे स्वपरागीभवन, कमी पक्वता कालावधी व C4 वर्गीय तृणधान्य हे प्रमुख गुणधर्म आहेत. भारतात या पिकाची आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना, राजस्थान, महाराष्ट्र, तामिळनाडू, मध्यप्रदेश व उत्तरप्रदेश या राज्यात लागवड केली जाते.

पौष्टिक भरडधान्य पिकांचे लागवडीच्या दृष्टीने महत्व : कमी पक्वता कालावधी असणारी पिके, हलक्या व जमिनीत उत्तम वाढ होते. वाढीच्या काळात कमीत कमी निविष्ठा वापरून वाढ पूर्ण करतात,सुधारित तंत्रज्ञानानुसार लागवड केल्यास उत्तम प्रतिसाद देणारी व अधिक उत्पादन देणारी पिक आहेत. बदलत्या हवामानात तग धरणारी पिक व तसेच आकस्मिक शेतीकरिता नियोजन केले जाऊ शकते. उत्तम प्रकारचे पौष्टिक गुणधर्म असल्याने आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर. भविष्यात मागणी वाढणारी पीक आहे.

**राळा पिकाचे पौष्टिक गुणधर्म :**

अ) प्रथिने व खनिज पदार्थ: 'राळा' आहाराच्या दृष्टिने एक अत्यंत महत्वाचे पौष्टिक तृणधान्य आहे. पौष्टिक घटकांबरोबरच चांगल्या प्रतीचे पोषक तंतुमय पदार्थ असल्याने बद्धकोष्टता होत नाही. राळा या पिकाच्या धान्यामध्ये सर्वाधिक प्रथिनांचे प्रमाण व स्निग्ध पदार्थ आहेत. तसेच कॅल्शियम, मॅग्नेशियम, झिंक आणि लोह या खनिजाचे प्रमाण जास्त आहे. ब) जीवनसत्वे:भरडधान्य पिकांचा आणखी वैशिष्ट्य पूर्ण गुणधर्म म्हणजे या पिकांमध्ये मुबलक असलेले जीवनसत्वाचे प्रमाण. राळा धान्यामध्ये थायमिन बी-१, रायबोफ्लेवीन बी-२, नियासिन (बी-३) व फॉलिक असिड याचे प्रमाण सर्वाधिक आहे.

'राळा' पिकाच्या धान्यामध्ये तंतुमय पदार्थांचे प्रमाण अधिक असल्याने अन्न पचन होण्यास मदत होते, पचनाशी निगडीत व्याधी कमी केले जाऊ शकतात. नित्य सेवन करणाऱ्या लोकांमध्ये हृदयरोग, आतड्यांवरील व्रण आणि मधुमेहाचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. धान्यापासून भाकरी, माल्ट, नुडल्स, पापड, इडली, बिस्कीटे यासारखे खाद्यपदार्थ तयार करता येतात. तसेच गरोदर माता व लहान मुलांच्या खाद्यामध्ये वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे.

**सुधारित लागवड तंत्रज्ञान :**

जमीन व हवामान : या पिकाच्या लागवडीसाठी हलकी ते मध्यम, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन उत्तम आहे. महाराष्ट्रात या पिकाची लागवड अत्यल्प क्षेत्रावर केली जाते. दक्षिणेकडील आंध्रप्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यात लागवड क्षेत्र अधिक आहे. तसेच या पिकाची लागवड ५०० ते ७०० मि.मी. वार्षिक पर्जन्यमान असलेल्या ठिकाणी करता येऊ शकते.

पुर्वमशागत : जमिनीची खोल नांगरट करुन उभ्या आडव्या कुळवाच्या दोन पाळ्या देऊन ४ ते ५ टन शेणखत/कंपोस्ट खत याचवेळी शेतात मिसळून जमीन भुसभुशीत करावी. पूर्वी घेतलेल्या पिकाचे धसकटे, काडीकचरा व बहुवार्षिक गवताचे अवशेष वेचून शेत स्वच्छ करावे.

सुधारीत वाण : राज्यात लागवड केले जाणारे सुधारीत वाण महाराष्ट्रात राळा या पिकाचा 'पी.डी.के.व्ही. यशश्री' (इत्रऋच् ८२) वाण लागवडीसाठी सन २०२३ मध्ये शिफारसित करण्यात आलेला आहे. हा वाण डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, बुलढाणा येथून विकसित करण्यात आलेला आहे.

'पी.डी.के.व्ही. यशश्री' वाणाची ठळक वैशिष्ट्ये : धान्य उत्पादन क्षमता (२३२४ कि./हे.), कडबा उत्पादन क्षमता (४४८९ कि./हे.), या वाणाचे दाणे मध्यम टपोरे असून रंग आकर्षक फिक्कट पिवळसर आहे. हा वाण ८१-८५ दिवसात पक्व होतो. या वाणाचे कणीस घट्ट असतात. हा वाण करपा आणि तांबेरा रोगास सहनशील आहे.

बियाणे व पेरणीची पध्दत

पेरणीची/लावणीची वेळ : या पिकाचा खरीप हा प्रमुख हंगाम आहे. बियाणे पेरणी पावसाचे आगमन होताच अथवा पाण्याची सुविधा असल्यास जूनच्या पहिल्या पंधरवाड्यात करावी. रोपांची लागण रोपे २० ते २५ दिवसांची झाल्यावर जुलैच्या पहिल्या पंधरवाड्यात मुख्य शेतात ओळीमध्ये करावी.

बियाणे प्रमाण : पेरणीद्वारे पिक लागवड करायची असल्यास ओळीमध्ये पेरणी करावी. त्यासाठी ८ ते १० किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे. धान्याचा आकार लहान असल्याने त्यामध्ये २ ते ४ पट माती एकत्र करून पेरणी करावी म्हणजे पेरणी दाट होणार नाही. बियाणे १ ते १.५ से. मी. पेक्षा जास्त खोल जाणार नाहीत याची काळजी घ्यावी म्हणजे उगवण चांगली होते.

पेरणी अंतर : पेरणी करताना दोन ओळीमधील अंतर ३० से.मी. (एक फुट) व दोन रोपामंधील अंतर १० से.मी. ठेवावे.

खत व्यवस्थापन : पेरणीपूर्वी एक महिना अगोदर शेणखत अथवा कंपोष्ट खत ५ ते १० टन प्रति हेक्टर या प्रमाणे जमिनीत मिसळून द्यावे. राळा पिकासाठी रासायनिक खताची मात्रा ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश प्रति हेक्टर याप्रमाणे द्यावे. अर्धे नत्र व संपूर्ण पालाश व संपूर्ण स्फुरद मात्रा पेरणी करताना द्यावी व उरलेले अर्धे नत्र पेरणी नंतर एक महिन्याने द्यावे.

पाणी व्यवस्थापन : या पिकाची लागवड कमी पावसाच्या भागात परंतु पाण्याची उपलब्धता असलेल्या ठिकाणी करता येते. पावसाळी हंगामात पावसाचा जास्त दिवस खंड पडल्यास पाणी देणे अत्यंत आवश्यक आहे. पहिले पाणी फुटवे अवस्थेत, दुसरे फुलोरा येताना व तिसरे पाणी दाणे भरण्याच्या अवस्थेत देणे आवश्यक आहे. त्यामुळे दाणे चांगले भरून उत्पादनात वाढ होते.

**पीक संरक्षण (किड व रोग व्यवस्थापन):**

करपा (Blast) रोग : 'राळा' या पिकामध्ये कणसातील करपा रोगाचा प्रादुर्भाव होतो. यामध्ये पानांवर दंडगोलाकार पांढरे ठिपके येतात व नंतर त्याचा आकार वाढून संपूर्ण पानावर, खोडावर पसरतात. त्यामुळे अपेक्षित उत्पादन मिळत नाही. या रोगाच्या नियंत्रणासाठी थायरम किंवा कार्बेन्डॅझिम या बुरशीनाशकाची २ ग्रॅम/ किलो बियाणे याप्रमाणे पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी अथवा ०.१ % प्रमाणे फवारणी करावी.

खोडकिड : पेरणीनंतर पिक ६ आठवड्याचे असताना खोडकिडीचा प्रादुर्भाव सुरु होतो. या किडीच्या अळीद्वारे मुख्य खोडाचे नुकसान होऊन मर होते. त्यामुळे फुटव्यावर परिणाम होतो. सर्वाधिक नुकसान जुलै महिन्याच्या शेवटी व ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला जाणवते. खोडकिड नियंत्रणासाठी प्रचलित किडनाशकाचा किंवा पद्धतीचा वापर करावा.

उपाययोजना: पावसाळा सुरु होताच ७ ते १० दिवसाच्या आत पेरणी करावी तसेच पेरणीकरीता जास्त बियाणे वापरावे.

आंतरमशागत : आंतरमशागत करताना रोपांची प्रति एकरी योग्य संख्या ठेवण्यासाठी पेरणीनंतर २० दिवसांच्या आत विरळणी करावी. पीक वाढीच्या सुरुवातीच्या काळात पिकाची वाढ संथ गतीने होत असल्याने तणे पिकाशी स्पर्धा करतात. त्यामुळे तणनियंत्रणासाठी एक कोळपणी करुन गरजेनुसार एक महिन्याच्या आत एक खुरपणी करावी.

काढणी व मळणी : राळा पिकाच्या विविध वाणानुसार पक्वता कालावधी वेगळा असु शकतो. साधारणपणे ८० ते १०० दिवसात पीक काढणीस सुरुवात करावी. काढणीस उशीर झाल्यास कणसातील/बोंडातील दाणे झडण्याची शक्यता असते. पिकाची काढणी करताना कणसे/बोंडे विळ्याने कापून करावी. दोन-तीन दिवस उन्हात चांगली वाळल्यानंतर कणसे बडवून मळणी करावी. धान्य उन्हात चांगले वाळवून हवेशीर जागी साठवण करुन ठेवावे.

उत्पादन : हे पीक लागवड करताना वापरण्यात येणाऱ्या निविष्ठा व सुधारित तंत्रज्ञानास उत्तम प्रतिसाद देणारे पिक आहे. या पिकापासून सरासरी हेक्टरी २० ते २५ क्विंटल प्रति हेक्टर धान्य उत्पादन घेता येते.

(संदर्भ:- अ.भा.स,नाचणी व तत्सम तृणधान्य संशोधन प्रकल्प, विभागीय कृषि संशोधन केंद्र, कोल्हापूर, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत)

**- दत्तात्रय कोकरे**
वरिष्ठ सहायक संचालक (मा)
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय,
मुंबई.

# 'आयुष्मान भव:' मोहिमेतून होणार आरोग्य सेवांचा जागर

केंद्र शासन देशभर १७ सप्टेंबरपासून आयुष्मान भव: मोहीम राबवीत आहे. या मोहिमेच्या माध्यमातून विविधस्तरावर आरोग्य विषयक सेवा देण्यात येत आहे. मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाने देखील आपली यंत्रणा सज्ज ठेवली आहे. देशभर मोहिमेचा शुभारंभ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते १३ सप्टेंबर रोजी करण्यात आला. राज्यस्तरीय कार्यारंभ दिन कार्यक्रमाचे मुंबईतही १३ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले. ही मोहीम ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत राबविण्यात येत आहे. आयुष्मान भव: शब्दाप्रमाणे सर्वांना सुदृढ आरोग्य मिळावे, या हेतूने शासन काम असून मोहिमेच्या माध्यमातून आरोग्य सेवांचा जागर करण्यात येत आहे.

आयुष्मान भव: हा आशिर्वादरूपी शब्द आपल्या आयुष्यात खूप महत्वाचा आहे. या शब्दाच्या अर्थावरच ही मोहीम आधारित आहे. मोहिमेचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनी १७ सप्टेंबरपासून झाला आहे. राज्यातही राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत मोहिमेचा कार्यारंभ करण्यात आला. मोहिमेदरम्यान क्षयरोग मुक्त भारत अभियान जोरकसपणे राबविण्यात येत आहे. जास्तीत जास्त निक्षय मित्र बनवून क्षयरोग मुक्त भारत अभियानाला बळ देण्यात येत आहे. देशभरात मोहिमेदरम्यान घेतलेल्या उपक्रमांची, कार्यक्रमांची नोंदणी करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने संकेतस्थळही विकसित केले आहे. मोहिमेची संपूर्ण माहिती डॅश बोर्ड स्वरूपात https:// ayushmanbhav. mohfw. gov. in/public/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या संकेतस्थळावर देशातील कुठल्याही जिल्ह्यातील माहिती उपलब्ध आहे.

मोहिमेंतर्गत आयुष्मान आपल्या दारी ३.०, आयुष्मान सभा, आयुष्मान मेळावा, अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची तपासणी आदी उपक्रम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान सेवा पंधरवडा राबविण्यात येत आहे. या पंधरवड्याच्या समारोपप्रसंगी २ ऑक्टोबर रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

आयुष्मान आपल्या दारी ३.० : 'आयुष्मान आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत आजपर्यंत संपूर्ण देशात २५ कोटी आयुष्मान कार्डाचे वाटप करण्यात आले आहे. या अनुषंगाने या उपक्रमामधून सर्व जिल्ह्यांमधील पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करून आयुष्मान कार्डचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी काळजी घेण्यात येत आहे. वैयक्तिकस्तरावर आयुष्मान कार्ड संपृक्तता प्राप्त करणे, आयुष्मान कार्डची छपाई आणि वितरण अशाप्रकारे सर्व राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमध्ये आयुष्मान कार्ड वितरण मोहीम सुरू झालेली आहे.

आयुष्मान सभा : हा उपक्रम गावपातळीवर आरोग्य सेवा सुविधांची जनजागृती करण्याकरीता ग्रामपंचायत व व्हीएचएसएनसी (व्हिलेज हेल्थ, सॅनिटेशन ॲण्ड न्युट्रीशन कमिटी) यांच्यामार्फत राबविण्यात येतो. या मोहिमेचे मूळ उद्दिष्ट आयुष्मान कार्ड व आभा कार्डबाबत जनजागृती करणे, आरोग्यवर्धिनी केंद्रामार्फत असंसर्गजन्य आजार, सिकलसेल, लसीकरण व क्षयरोग आदीबाबत जनजागृती करणे, तसेच आरोग्यवर्धिनी केंद्रस्तरावर मिळणाऱ्या सेवा सुविधांचे मूल्यमापन करणे हा आहे. या सभेद्वारे आयुष्मान कार्ड व आभा कार्ड तयार करणे, प्रधानमंत्री आयुष्मान भारत जन आरोग्य योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांची व प्रत्यक्षात लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करणे, संलग्न रुग्णालयांची यादी प्रसिद्धी देणे, असंसर्गजन्य रोग, सिकलसेल, आयुष्मान कार्ड व आभा कार्ड यांची जनजागृती करण्यात येत आहे. आयुष्मान भव: मोहिमेमध्ये 'निरोगी गावे' आणि 'निरोगी ग्रामपंचायती' निर्माण करण्याचा प्रयत्न असणार आहे. ज्या पंचायती आरोग्य योजना यशस्वीपणे पूर्ण करतात, त्यांना 'आयुष्मान ग्रामपंचायत' किंवा 'आयुष्मान अर्बन वॉर्ड' म्हणून सन्मान देण्यात येणार आहे, जे त्यांच्या न्याय आरोग्य सेवेच्या तरतुदीच्या समर्पणाचे प्रतीक आहे.




आयुष्मान मेळावा : आयुष्मान भारत आरोग्यवर्धिनी केंद्रावर दर आठवड्यातील शनिवार किंवा रविवारला संकल्पनेनुसार उपक्रम राबविण्यात येत आहे. पहिल्या आठवड्यात असंसर्गजन्य आजारांविषयी तपासणी, दुसऱ्या आठवड्यात क्षयरोग, कुष्ठरोग आणि अन्य संसर्गजन्य आजारांची तपासणी, तिसऱ्या आठवड्यात माता व बाल आरोग्य, पोषण आहार व लसीकरण, चौथ्या आठवड्यात डोळ्यांची तपासणी व डोळ्यांचे आरोग्य ही संकल्पना असणार आहे. या मेळाव्यादरम्यान आयुष्मान कार्ड व आभा कार्ड तयार करण्यात येणार आहे. सर्व समावेशक आरोग्य सेवा, आयुष, मानसिक आरोग्य, वाढत्या वयातील आजार व उपचार, मौखिक आरोग्य, नेत्र, कान, नाक व घसा यांचे आरोग्य, समुपदेशन सेवा, योगा व वेलनेस उपक्रम, मोफत औषधी, प्रयोगशाळा तपासणी तसेच टेलीकन्सल्टेशन सेवा देण्यात येत आहेत.

सामुदायिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकीय महाविद्यालयाच्या मार्फत आठवड्याला किमान एक आरोग्य मेळाव्याचे आयोजनही करण्यात येणार आहे. या मेळाव्यात तज्ज्ञ सेवांपासून वंचित रुग्णांना सेवा पुरविण्यात येणार आहे. तसेच ज्या तालुक्यांमध्ये तज्ज्ञ सेवांचा अभाव आहे, अशा तालुक्यांमध्ये रुग्णांना तज्ज्ञ सेवांचा लाभ देण्यात येणार आहे.

**अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील मुलांची तपासणी**

या उपक्रमांतर्गत सर्व अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची विशेष मोहीम राबवून आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. मुलांची ३२ सामान्य आजारांची वेळेवर तपासणी व उपचार करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार मुलांना सहाय्यक उपकरणे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच मोहिमेत रक्तदान शिबिरांचे आयोजनही करण्यात येणार आहे. अशाप्रकारे राज्यात १७ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या आयुष्मान भव : मोहिमेतून ३१ डिसेंबरपर्यंत आरोग्यविषयक सेवांचा जागर सुरू आहे.

**-नीलेश तायडे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# आता तुमच्या इच्छेनुसार तयार करा इमोजी, गुगलचे हे अप्रतिम फीचर येईल कामी

गुगलने जी-बोर्डमध्ये एक नवीन फीचर लाँच केले आहे. काही वर्षांपूर्वी गुगलने अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी जी-बोर्डमध्ये इमोजी किचन फीचर लाँच केले होते. आता वेब आणि आयफोन वापरकर्ते देखील हे वैशिष्ट्य वापरू शकतात आणि त्यांचे स्वतःचे इमोजी स्टिकर्स तयार करू शकतात. ऋैसश्रश एोक्षळ घळींलहशप सह, तुम्ही सानुकूल इमोजी तयार करू शकता आणि ते तुमच्या कुटुंब आणि मित्रांना पाठवू शकता. हे वैशिष्ट्य सध्या Google वेब सर्च वर उपलब्ध आहे, जे तुम्ही कोणत्याही डिव्हाइसवरून वापरू शकता.

तुम्हालाही हे फीचर वापरायचे असेल तर आम्ही तुम्हाला गुगल इमोजी किचन कसे वापरायचे, ते सांगणार आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही तुमच्या आवडीचे इमोजी खाली दिलेल्या स्टेप्स फॉलो करुन सहज तयार करू शकता.

गुगल सर्च वर जाऊन इमोजी किचन सर्च करा.

Get cooking वर क्लिक करा. स्क्रीनच्या डाव्या बाजूला तुम्हाला इमोजींची यादी दिसेल.

तुम्हाला वापरायच्या असलेल्या इमोजीवर क्लिक करा.

स्क्रीनच्या उजव्या बाजूला तुम्हाला सर्व संभाव्य सानुकूल इमोजी सापडतील.

तुम्ही वापरू इच्छित असलेल्या दुसऱ्या इमोजीवर क्लिक करा.

एक नवीन सानुकूल इमोजी तयार होईल.

सानुकूल इमोजी कॉपी करा आणि ते तुमच्या कुटुंब आणि मित्रांसह शेअर करा.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य



# शांत झोपेसाठी...

आजच्या धकाधकीच्या जीवनात शांत, निवांत झोप मिळणं दुरापस्त झालंय. डेडलाइन्स पूर्ण करताना झोपेकडे पूर्ण दुर्लक्ष होतंय. यामुळे ताण वाढतोय. प्रत्येकाने शांत झोप घेणं गरजेचं आहे. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी ते महत्वाचं ठरतं. मोनस्वास्थ्य जपण्याच्या या काही टिप्स...

**गॅझेट्स लांब करा**

झोपायाची तयारी सुरू असताना गॅझेट्स दूर ठेवा. सोशल नेटवर्किंग साइट्स, व्हॉट्सॲपमुळे आपण लोकांच्या सतत संपर्कात असतो. आपल्या झोपेवर गॅझेट्सचा विपरित परिणाम होऊ लागलाय. झोपेच्या वेळेत काम आणू नका. झोपण्याच्या तासभर आधी गॅझेट्सपासून दूर राहा.

**झोपेची वेळ**

झोपेची पद्धत ठरवा. ठरलेल्या वेळी पलंगावर जा. वेळेत झोपा. सकाळी लवकर उठा. झोपण्याची आणि उठण्याची वेळ निश्चित करा. सात ते आठ तार झोप घ्या.

**योग्य वातावरण**

खोलीतलं वातावरण झोपेसाठी योग्य असू द्या. झोपण्याआधी दिवे बंद करा. आजूबाजूला खोलीत शांतता असू द्या.

**मनपसंत रंग**

पलंगावर आपल्या आवडीच्या रंगाची चादर अंथरा. तसेतर हलक्या रंगाची चादर सर्वात योग्य असते तरी आपण आपल्या आवडीप्रमाणे रंग आणि प्रिंट निवडून चादर अंथरून झोपा.

**मन शांत**

झोपण्यापूर्वी भीतिदायक चित्रपट किंवा दृश्य बघू नका. यामुळे झोपेत अडथळे येऊ शकतात.

**शारीरिक थकवा आवश्यक**

सतत कार्यरत राहा. नियमित व्यायाम करा. व्यायामामुळे तुम्हाला शांत झोप लागते. झोपण्याच्या तीन ते चार तास आधी व्यायाम करता येईल. झोपण्यापूर्वी आंघोळ केल्यानेही शांत झोप येते.

# केवळ हानिकारकच नव्हे, तर आरोग्यासाठीही फायदेशीर ठरू शकतो पास्ता, जाणून घ्या काय आहेत त्याचे फायदे




दिवसभर सक्रिय राहण्यासाठी, प्रत्येकाने सकाळी निरोगी नाश्ता करणे महत्वाचे आहे. पोहे, उपमा, दलिया - अशा अनेक पदार्थ हेल्दी ब्रेकफास्ट म्हणून उपलब्ध आहेत, जे चवीसोबतच आरोग्याचीही काळजी घेतात. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, सकाळचा नाश्ता हा दिवसातील सर्वात महत्वाचा आहार आहे. त्यामुळे नाश्ता करणे टाळू नका. हेल्दी ब्रेकफास्ट वजन राखण्यात तर मदत करतोच, पण स्मरणशक्तीही वाढवतो. काही लोक नाश्त्यात पास्ताही खातात. जरी, बहुतेक लोक पास्ता एक अस्वास्थ्यकर अन्न श्रेणी मानतात, पास्ता हा एक निरोगी नाश्ता पर्याय देखील असू शकतो. त्यामुळे येथे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत की अस्वास्थ्यकर मानला जाणारा पास्ता तुमच्यासाठी कसा फायदेशीर ठरू शकतो.

**नाश्त्यासाठी पास्ता**

लोकांनी पिठापासून बनवलेल्या पास्ताला हेल्दी ब्रेकफास्ट पर्याय म्हणून कधीच मानले नाही. पण आता फक्त मैदाच नाही, तर पास्ताचे अनेक प्रकार बाजारात येऊ लागले आहेत. त्यामुळे जर तुमच्या मुलाला पास्ता आवडत असेल, तर तुम्ही गव्हाचा पास्ता तयार करून त्याला खायला देऊ शकता. गव्हाच्या पास्त्यात फायबर, लोह, व्हिटॅमिन बी आणि खनिजे भरपूर प्रमाणात असतात. सामान्य पास्ताच्या एका कपमध्ये २२१ कॅलरीज असतात, परंतु गव्हाच्या पास्त्याबद्दल बोलायचे तर, एक कप गव्हाच्या पास्तामध्ये १७४ कॅलरीज असतात.

**सकाळी हेल्दी ब्रेकफास्ट करणे गरजेचे**

साधारणपणे असे मानले जाते की सकाळी उठल्यानंतर २ तासांच्या आत नाश्ता केला पाहिजे. सकाळचा नाश्ता तुमच्या संपूर्ण दिवसासाठी खूप महत्वाचा असतो. त्यामुळे तुम्ही नाश्त्यात काय खात आहात, याची काळजी घेणे गरजेचे आहे. सकाळच्या नाश्त्यामध्ये फायबर, प्रथिने, लोह आणि व्हिटॅमिन बी यांसारख्या अनेक पोषक तत्वांचा समावेश असायला हवा, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

**गव्हाच्या पास्ताचे फायदे**

संपूर्ण गव्हाचा पास्ता सामान्य पास्तापेक्षा खूप वेगळा असतो. संपूर्ण गहू हा पास्ता बनवण्यासाठी वापरला जातो, तर सामान्य पास्ता प्रक्रिया केलेल्या गव्हापासून बनवला जातो. १०० ग्रॅम संपूर्ण गव्हाच्या पास्तामध्ये ३७ ग्रॅम कार्बोहायड्रेट, ६ ग्रॅम फायबर, ७.५ ग्रॅम प्रथिने, १७४ कॅलरीज आणि ०.८ ग्रॅम चरबी असते. संपूर्ण गव्हाचा पास्ता खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळीही नियंत्रणात राहते.

**कोलेस्ट्रॉल नियंत्रित करा**

होल व्हीट पास्ता तुमचे वजन वाढवत नाही आणि तुमच्या पचनासाठी हा एक आरोग्यदायी पर्याय आहे. हे खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलही वाढत नाही. त्यामुळे जर तुम्हालाही पास्ता खाण्याची आवड असेल, तर संपूर्ण गव्हाचा पास्ता तुमच्या नाश्त्यासाठी आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो.

# फूड पॉयझनिंग झाल्यास घरगुती उपाय



बऱ्याचदा काहींना वेगळं किंवा रस्त्यावरचे पदार्थ खाल्ल्याने फूड पॉयझनिंग होते. अशावेळी डॉक्टरकडे जाण्याआधी यावर काही घरगुती उपाय करता येतात जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. तुम्ही हे उपाय घरच्या घरी केल्यास तुम्हाला तात्काळ बरं वाटेल.

**फूड पॉयझनिंग झाल्यावर घरगुती उपाय**

फूड पॉयझनिंग झाल्यानंतर तेलकट खाणं टाळावे तसेच डेअरी उत्पादन, कॅफीन आणि दारू यापासूनदेखील दूर राहावे. फूड पॉयझनिंग झाल्यानंतर सतत पाणी पित राहणं गरजेचं आहे.

**लसूण**

लसणात अँटी व्हायरल, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल हे गुण असतात. यामुळे डायरिया आणि पोटदुखीपासून लगेच आराम मिळतो. १-२ लसणाच्या पाकळ्या खाल्ल्यानंतर एक ग्लास गरम पाणी प्यायल्यास त्वरीत आराम मिळतो.

**ॲप्पल व्हिनेगर**

ॲप्पल व्हिनेगरमध्ये असणाऱ्या ॲसिडमुळे जळजळ कमी होते आणि लगेच आराम मिळतो. २ चमचा ॲप्पल व्हिनेगर एक ग्लास गरम पाण्यात घालून घ्यावे आणि खाण्यापूर्वी हे दिवसभर पाणी प्यावे.

**लिंबू पाणी**

लिंबू पाण्यामुळे पोटात इन्फेक्शन वाढवणारे बॅक्टेरिया कमी होतात. तसंच आपलं पचनतंत्र व्यवस्थित राखण्यासाठी लिंबू पाणी रोज प्यायल्यास चांगलं असतं. चिमूटभर साखर लिंबू पाण्यात मिसळून दिवसातून २ ते ३ वेळा प्यावे. यामुळं फूड पॉयझनिंग कमी होते.

**मध**

मधामध्ये अँटीबॅक्टेरियल आणि अँटीफंगल असते. मधामुळे ॲसिडिटी कमी होते आणि फूड पॉयझिनिंगपासून आराम मिळतो. १ चमचा मध दिवसभरातून किमान ३ वेळा घ्यावे. त्यामुळे शरीरात ॲसिड बनत नाही आणि पोटाला आराम मिळतो.

**तुळस**

तुळशीमुळे पोटदुखीच्या समस्यांपासून सुटका होते आणि फूड पॉयझनिंगदेखील दूर होते. यामधील अँटी मायक्रोबियल गुणामुळे पोटातील कोणताही बॅक्टेरिया मारून टाकण्याचं काम तुळस करते. २- ३ कप पाण्यात ताजी तुळशीची पानं टाकून उकळून घ्यावं. हे पाणी थंड झाल्यावर दिवसातून २- ३ वेळा प्यावे.



# या '५' सवयी वाढवतात व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास

**फार काळ बसणं :** एकाच ठिकाणी उभं राहणं त्रासदायक आहे त्याचप्रमाणे एकाच जागेवर बसून राहणंदेखील आरोग्याला नुकसानकारकच ठरते. डेस्क जॉब असणाऱ्यांना हा त्रास अधिक जाणवतो. फार काळ बसून राहिल्याने लठ्ठपणा वाढण्यासोबतच व्हेरिकोज व्हेन्सचा त्रासही वाढतो. त्यामुळे ठराविक वेळाने उठून थोड्यावेळ फिरा.

**फार काळ उभं राहणं :** काही लोकांना नोकरी करताना त्याचा एक भाग म्हणून सतत उभं राहव लागतं. एकाच जागी फार काळ उभं राहिल्यास व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास वाढतो. एकाच जागी उभं राहण्यापेक्षा थोडं चाला, फिरा. अन्यथा पायांवर ताण येतो. रक्त साखळण्याचा धोका वाढतो. हळूहळू रक्तवाहिन्यांमधील व्हॉल्वला देखील नुकसान होते.

**हाय हिल्स :** जास्त प्रमाणात हिल्स घालणं मुलींना फार आवडतं पण त्यामुळे आरोग्यावर नकळत काही परिणाम होऊ शकतो. हिल्स घालून चालल्याने रक्तवाहिन्यांच्या कार्यात अडथळा येतो. परिणामी व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास बळावतो.

**मिठाचा वापर जास्त :** वेफर्स, लोणचं, पापड यामध्ये मीठ अधिक असते पण त्याचा आहारात अधिक प्रमाणात समावेश केल्यास व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास वाढू शकतो. मिठामुळे शरीरात पाणी साचून राहते आणि त्याचा ताण रक्तवाहिन्यांवर येतो.

**पाय क्रॉस करून बसणं :** पायावर पाय ठेवून बसण्याच्या सवयीमुळे पायांवर आणि हिप्सवरही ताण येतो. यामुळे रक्तवाहिन्या फुगतात. हळूहळू जाळं वाढतं.

# तुप लावून चपाती खाल्ल्याने वाढते का वजन? जाणून घ्या दाव्याची सत्यता




देशी तूप भारतीय घरांमध्ये शतकानुशतके वापरले जात आहे. देशी तुपातील औषधी गुणधर्मामुळे घरगुती उपचारांमध्येही त्याचा वापर केला जातो. पण बहुतेक लोकांना देशी तूप चपातीला लावून खायला आवडते. तूप केवळ चपातीची चवच वाढवत नाही, तर ते आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. ज्या लोकांना वजन कमी करायचे आहे, ते अनेकदा तुपापासून दूर राहतात. चपातीला तूप लावण्यापूर्वी ते अनेक वेळा विचार करतात. काही लोकांचा असा विश्वास आहे की जर त्यांनी चपातीला तूप लावून खाल्ल्यास वजन वाढते. तुपामध्ये अनेक प्रकारचे फॅट्स असतात, ज्यामुळे लोक आपल्या आहारात त्याचा समावेश करण्यास घाबरतात.

तुप लावून चपाती खाल्ल्याने वजन वाढते का?

न्यूट्रिशियनिस्ट सांगतात की चपातीला तूप लावून खाण्याचा वजन वाढण्याशी काही संबंध नाही. हे एक मिथक आहे. ते म्हणतात की जर चपातीवर तूप लावून खाल्ल्यास वजन कमी करणे सोपे होईल, कारण त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी होईल. यामुळे रक्तातील साखर वाढण्यापासूनही बचाव होईल. ग्लायसेमिक इंडेक्स आपल्या रक्तातील ग्लुकोजवर अन्न किती लवकर परिणाम करतो हे सांगते.

तूप खाल्ल्याने फक्त चांगले कोलेस्ट्रॉल सुधारत नाही, तर हार्मोन्सचे संतुलनही सुधारते, असेही आरोग्य तज्ज्ञ सांगतात. ज्यांना पचनाशी संबंधित कोणतीही समस्या आहे, त्यांच्यासाठी देशी तूप खूप फायदेशीर ठरू शकते. आपण जे काही अन्न खात आहोत, त्यात तूप घातल्याने त्याचे शोषण दुप्पट होते.

कदाचित तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की करीना कपूर आणि मलायका अरोरा यांच्यासह अनेक बी-टाउन सेलिब्रिटी त्यांच्या दिवसाची सुरुवात तुपाने करतात. हे त्यांना वजन कमी करण्यास मदत करते.

# वयाच्या ३० व्या वर्षी पांढरे होत आहेत केस? आयुर्वेदाच्या या पद्धतींनी पुन्हा होतील काळे

साधारणपणे, लोकांचे केस वयाच्या ५० व्या वर्षानंतर पांढरे होतात, पण आजकाल वयाच्या ३० व्या वर्षीच केस पांढरे होऊ लागतात. अनुवांशिक कारणे, खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, मानसिक ताणतणाव आणि आहारातील पोषणाचा अभाव यामुळे या समस्या उद्भवत आहेत. कमी वयात केस पांढरे होणे, ही एक मोठी समस्या बनत आहे. अनेकजण केस काळे करण्यासाठी



रंगी लावतात, पण रंगामुळे केसांना खूप नुकसान होते. हे टाळण्यासाठी आयुर्वेदाची मदत घेणे गरजेचे आहे. आयुर्वेदातील काही टिप्स फॉलो करून केस पांढरे होणे टाळता येते.

याबाबत आयुर्वेदतज्ज्ञ सांगतात की, खाण्याच्या चुकीच्या सवयींमुळे २० ते ३० वर्षांच्या वयातच केस पांढरे होत आहेत. हे मेलेनिनच्या कमी उत्पादनामुळे देखील होते. काही लोकांमध्ये, अनुवांशिक कारणांमुळे केस लवकर पांढरे होऊ लागतात. केस पांढरे होणे टाळण्यासाठी आयुर्वेदातील काही पद्धतींचा अवलंब केला जाऊ शकतो. त्यासाठी तुम्ही या टिप्स फॉलो करू शकता.

भृंगराज : भृंगराज हे केसांसाठी उत्कृष्ट औषध आहे. या आयुर्वेदिक औषधी वनस्पतीच्या मदतीने केस पांढरे होण्याची समस्या बऱ्याच प्रमाणात नियंत्रित केली जाऊ शकते. भृंगराज पावडर पाण्यात किंवा दह्यात मिसळून मास्क तयार करा आणि केसांना लावा. हा हेअर मास्क किमान १५ मिनिटे केसांवर ठेवा आणि नंतर चांगल्या शॅम्पूने केस स्वच्छ करा.

खोबरेल तेल : खोबरेल तेल केसांसाठी देखील चांगले औषध आहे. यामुळे केस पांढरे होण्याचा वेग कमी होऊ शकतो. खोबरेल तेल किंचित गरम करून केसांना लावल्यास खूप फायदा होतो.

मेहंदी आणि मेथी : मेहंदी आणि मेथी पावडरचे द्रावण तयार करा. या द्रावणाने तुमच्या डोक्याला मसाज करा आणि त्यात थोडे खोबरेल तेलही टाका. मालिश केल्यानंतर आपले डोके धुवा.

आवळा आणि तीळ : आवळा आणि तीळ देखील केस पांढरे होण्यास प्रतिबंध करू शकतात. आवळा बारीक करून पेस्ट बनवा आणि त्यात तीळ घाला. ते मिसळा आणि केसांना लावा. अर्धा तास राहू द्या आणि नंतर डोके धुवा. यामुळे खूप फायदा होईल.

या गोष्टी लक्षात ठेवा : आयुर्वेदतज्ज्ञ सांगतात की या आयुर्वेदिक टिप्सच्या मदतीने काळे केस पांढरे होण्याची प्रक्रिया मंदावता येते, तथापि, यासोबतच तुम्ही तुमच्या आहाराची काळजी घेणे देखील महत्त्वाचे आहे. जीवनात मानसिक तणाव घेऊ नका आणि प्रथिने आणि जीवनसत्त्वांचा आहारात समावेश करा. या गोष्टी लक्षात ठेवल्या नाहीत तर आयुर्वेदाच्या या पद्धतींचा अवलंब केल्याने फारसा फायदा होणार नाही. अशा परिस्थितीत, आपले अंतर्गत आरोग्य सुधारणे महत्वाचे आहे आणि यासह आपण या टिप्स देखील फॉलो करू शकता.

# दारू सोडल्याने खरोखर कमी होतो का कर्करोग आणि मधुमेहाचा धोका? वैज्ञानिक दृष्टीकोनातून समजून घ्या




अमेरिकन जीवशास्त्रज्ञ रेमंड पर्ल यांनी अल्कोहोलवर एक पुस्तक लिहून रोज ठराविक प्रमाणात दारू प्यायल्यास हृदय निरोगी राहते, यावर भर दिला होता. हे पुस्तक, अनेक रुग्ण केस इतिहासावर आधारित, १९२६ मध्ये प्रकाशित झाले. जे दारू पिणाऱ्यांच्या या समजुतीचा आधार बनले की रोज फक्त दोन पेग पिल्ले, तर ते औषध आहे. दारू पिणारे बरेचदा असाच युक्तिवाद करतात, पण खरंच असे आहे का?

शास्त्रज्ञांचे अलीकडील या संशोधन अहवालाशी सहमत नाहीत. बायोलॉजिस्ट रेमंड पर्लच्या सिद्धांताला फाटा देत, संशोधनात असे म्हटले आहे की, अल्कोहोलचे आरोग्याला फायदे नव्हते, ते लोक शारीरिकदृष्ट्या निरोगी होते, त्यामुळे अल्कोहोलने त्यांचे नुकसान केले नाही. कारण दररोज मद्यपान केल्याने हृदयविकार निश्चितच होतो. वैज्ञानिकांच्या या संशोधनाला जामा नेटवर्क आणि जर्नल ऑफ कार्डियोव्हस्कुलर डेव्हलपमेंट अँड डिसीजमध्ये स्थान देण्यात आले आहे. हे देखील सांगते की अल्कोहोलचे सेवन थांबवणे आरोग्याच्या दृष्टिकोनातून कसे फायदेशीर आहे.

नेचर जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार, दारू पिल्याने व्यक्तीमध्ये सुमारे दोनशे आजारांचा धोका वाढतो. एका संशोधनानुसार, कितीही प्रमाणात अल्कोहोल शरीरात गेल्यावर त्याचा सर्वात आधी मेंदूच्या पेशींवर परिणाम होतो, त्याचा स्मरणशक्तीवर परिणाम होतो, रक्तात मिसळल्याने शरीराची प्रतिकारशक्तीवर परिणाम होतो, त्यामुळे क्लेब्सिएला न्यूमोनियाचा धोका वाढतो. फुफ्फुसासाठी हानिकारक आहे. या संशोधनात असेही म्हटले आहे की, कोणत्याही प्रमाणात दारू प्यायल्याने कर्करोग होऊ शकतो. जागतिक आरोग्य संघटनेने याबाबत इशारा दिला आहे.

आत्तापर्यंत अनेक संशोधनातून असे समोर आले आहे की दारू न पिल्याने एकाग्रता वाढते आणि गाढ झोप लागते. लाइव्ह सायन्समधील एका अहवालानुसार, एपिडर्मल ग्रोथ फॅक्टर, कॅन्सरला कारणीभूत असलेल्या प्रोटीनची पातळी ७० टक्क्यांहून अधिक कमी होते. याशिवाय, व्हॅस्क्युलर एंडोथेलियल ग्रोथ फॅक्टरमध्ये देखील घट झाली आहे, त्याची पातळी ४१ टक्क्यांपर्यंत पोहोचते. यामुळे हृदयविकाराचा धोकाही कमी होतो.

अल्कोहोलवर सतत काम करणारे संशोधक डॉ.केविन मूर यांनी दारू सोडण्याचे फायदे सविस्तरपणे सांगितले आहेत. त्यांनी ४५ वर्षांपर्यंतच्या लोकांवर संशोधन केले, ज्यामध्ये असे दिसून आले की एक महिना मद्यपान सोडल्यास रक्तदाबाचा धोका ६ टक्के, मधुमेहाचा धोका २६ टक्के आणि वजन सुमारे ६ टक्क्यांनी २ किलो कमी होऊ शकते.

अल्कोहोलमुळे कर्करोगाची प्रकरणे सतत वाढत आहेत. थक्का च्या अहवालानुसार, २०२० मध्ये दर २५ पैकी एका व्यक्तीमध्ये अल्कोहोल कर्करोगाचे कारण होते. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशननुसार २०२० मध्ये एकूण ७ लाख ४१ हजार ३०० कॅन्सरची प्रकरणे नोंदवली गेली होती, त्यापैकी ४ टक्के प्रकरणे दारूमुळे होते. मृत्यूच्या आकड्यांवर नजर टाकली तर, २०१९ मध्ये अमेरिकेत मद्यपानामुळे सुमारे ७८ हजार लोकांचा मृत्यू झाला, २०२० मध्ये हा आकडा जवळपास एक लाखावर पोहोचला.

लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com
LATUR BHUKAMP
शनिवार २३ सप्टेंबर २०२३


## एकसंघ भारताचे रक्षण संविधानामुळे झाले

लातूर : आपण स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करत आहोत. ७५ वर्षांमध्ये अखंड एकसंघ भारत ज्या देशात विविध बोलीभाषा, धर्म, पंथ आणि अनेक राज्य अशी बहुविविधता असूनही, एकसंघ अखंड भारताला एकात्म एकसंघ राहण्याची शक्ती संविधानामुळे मिळाली.

भारताचे आणि देशातील सर्व नागरिकांचे रक्षण संविधानामुळे होते. ते कसे या संदर्भात मौलिक विचार पुणे येथील सत्र न्यायालयात कार्यरत असलेले सुशीलादेवी देशमुख महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ड.सुरज मादेवार यांनी प्रतिपादन केले.

## आंतरराष्ट्रीय अंध महिला क्रिकेटर कु. गंगा संभाजी कदम हिचा सत्कार

लातूर : सध्या क्रिकेट या खेळाची जगभर नियमित चर्चा होत असते. जगामध्ये विविध देशांच्या अंध महिलांच्या क्रिकेट टीम आहे. भारतामध्ये सुद्धा अंध महिला क्रिकेट टीम आहे. दि. २० ते २७ ऑगस्ट २०२३ या कालावधीमध्ये इंग्लंड, भारत आणि ऑस्ट्रेलिया या तीन देशांमध्ये बरमिंगम (लंडन) येथे स्पर्धा संपन्न झाल्या. या तीन देशांमध्ये एकूण पाच सामने खेळल्या गेले. या सर्वच म्हणजे पाचही सामन्यात भारतीय अंध क्रिकेट टीमने विजय मिळवला आणि सुवर्णपदक प्राप्त केले. या विजयी टीममध्ये ऑल राऊंडर क्रिकेटर कु. गंगा कदम हिचे काल लातूरला आगमन झाले. या विजयाचे औचित्य साधून महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. शिवशंकरप्पा बिडवे यांच्या हस्ते तिचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच नॅबचे अध्यक्ष तथा रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. विजयभाऊ राठी आणि रोटरी क्लब ऑफ लातूरचे सदस्य राघवेंद्र इटकर आणि शिवराज लोखंडे यांनीही तिचे अभिनंदन केले. यावेळी माजी प्राचार्य डॉ. काशीनाथ राजे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, डॉ. माधव गोरे आणि प्रशांत गवंडगावे यांची उपस्थिती होती.



# जुन्या संसद भवनाचे नामकरण राष्ट्रपिता महात्मा गांधी विश्वशांती भवन करावे

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्रः एमआयटी डब्ल्यूपीयूच्या शिक्षक व विद्यार्थ्यांची मागणी

पुणे : आंतरराष्ट्रीय शांती दिवसाचे औचित्य साधून एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीने भारताच्या जुन्या संसद भवनाचे नामकरण राष्ट्रपिता महात्मा गांधी विश्र्वशांती भवन असे करावे. या संदर्भातील एक पत्र एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष विश्र्वधर्मी प्रा.डॉ. विश्र्वनाथ दा. कराड व जगप्रसिद्ध संगणकतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या स्वाक्षरीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कडे पाठविण्यात आले आहे. विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी या संदर्भात जोरदार मागणी केली आहे.

भारतीय संस्कृती, परंपरा, तत्वज्ञान, भारतमातेच्या स्वातंत्र्याच्या इतिहासाचे साक्षीदार, देशाच्या राजकारणाचे व स्वातंत्र्यचे ७५ वर्षे ज्यांने पाहिले अशी ही वास्तू म्हणजे जूने संसद भवन आहे. त्यामुळे या वास्तूला अहिंसेचे पुजारी राष्ट्रपिता महात्मा गांधी विश्र्वशांती भवन असे नामकरण करावे ही विनंती या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी निर्णयामुळे आज संपूर्ण विश्र्वात, संयुक्त राष्ट्रसंघ यूनोच्या मान्यतेने २ ऑक्टोंबर म्हणजेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने अहिंसा दिन व २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योगदिवसाच्या रूपाने साजरा करण्यात येत आहे. तसेच या संसद भवनातील इतिहासाचे जतन केल्यास या वास्तूचा सन्मान संपूर्ण विश्र्वात वाढेल. येणार्या काळात सृष्टीवर सत्यनिष्ठा आणि अहिंसेच्या माध्यमातून विश्र्वशांतीचे स्मरण होईल तेव्हा हा संवाद प्रस्तावित राष्ट्रपिता महात्मा गांधी विश्र्वशांती भवन मध्येच होईल. त्याच प्रमाणे या वास्तूतील सेंट्रल हॉल आणि राज्यसभा हॉलमध्ये विश्र्वशांती या विषयावर परिषदेंचे आयोजन करण्यात यावे.

संसद भवनाच्या बाहेर उभारण्यात आलेल्या १४४ स्तंभापैकी ७२ स्तंभांच्या जवळ १५ ते १८ फूट उंचीचे स्वातंत्र्य सेनानीचे चैतन्यमयी मुर्ती उभारण्यात यावी. यामुळे येणार्या पिढीसाठी येथील वैशवशाली इतिहास आणि परंपरेची माहिती मिळेल. अशा संदर्भातील आशयाचे एक पत्र एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्र्वनाथ दा. कराड व पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या स्वाक्षरीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांनी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा वापर करावा : डॉ. ठोंबरे

### दवणगाव येथे भव्य शेतकरी मेळावा संपन्न



लातूर : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय, लातूर च्या वतीने ग्रामीण कृषि कार्यानुभव आणि कृषि औद्योगिक जागरूकता उपक्रमांतर्गत मौजे दवणगाव येथे सद्यस्थितीत सोयाबीन पीक व्यवस्थापन या विषयावर शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून गावचे सरपंच श्री.रवींद्र नागरगोजे तर उदघाटक म्हणून लखमापुरचे प्रगतीशील शेतकरी अॅड.रमेश खाडप, प्रमुख पाहुणे म्हणून कृषि महाविद्यालय, लातूरचे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे व कार्यक्रम सह-समन्वयक डॉ.विश्र्वनाथ कांबळे हे उपस्थित होते

प्रमुख मार्गदर्शनपर भाषणात डॉ. बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळे २८ प्रात्यक्षिके दवणगाव व लखमापूर येथे घेतले असून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे. त्यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकात बहुसूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे व उत्पन्न वृद्धीसाठी विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. मार्गदर्शनपर भाषणात प्रा.अरुण गुट्टे, विस्तार कृषि विद्यावेत्ता यांनी सोयाबीन पिकातील चतु:सूत्री सांगितली. त्यामध्ये खोल नांगरट, बीज प्रक्रिया, कीड रोग नियंत्रणासाठी फवारणी करणे व बिगर हंगामी सोयाबीनची पेरणी शेतकऱ्यांनी टाळावी असे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या जमिनीच्या आरोग्य पत्रिकेवरून असे दिसून येते की, जमिनीमध्ये पालाशचे प्रमाण जास्त असून त्याचा वापर कमी करून खर्चामध्ये बचत करावी. जमिनीमध्ये जस्त, लोह व इतर सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असल्यामुळे ग्रेड - १ सूक्ष्म अन्नद्रव्य एकरी १० किलो याप्रमाणे पेरणीच्या वेळी वापर करावा. याप्रसंगी लखमापूर येथील प्रगतीशील शेतकरी अॅड.रमेश खाडप व दवणगावचे श्री.प्रभाकर नागरगोजे यांनी आपले समयोचित मनोगत व्यक्त केले. कृषिदूत राजेश जरस, सुदेश सिद्धेवार यांनी आपले मनोगत व्यक्त करून ग्रामीण कृषि कार्यानुभव उपक्रमामुळे आमचा सर्वांगीण विकास झाला असे नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.विलास टाकणखार यांनी, आभार डॉ.संघर्ष शृंगारे यांनी तर सूत्रसंचलन कृषिदूत रोहन जाधव व शिवकांत सरकाळे यांनी केले. यावेळी मान्यवरांच्या शुभ हस्ते दवणगाव व लखमापूर येथील शेतकऱ्यांना जमिनीच्या आरोग्य पत्रिकेचे वाटप करण्यात आले. तसेच पिकांमधील अन्न द्रव्याचे लक्षणे व मातीचा नमुना घेण्याची पद्धत या दोन भित्ती पत्रकांचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री.राजेभाऊ नागरगोजे, श्री.विशाल खाडप तसेच कृषिदूतांनी विशेष परिश्रम घेतले. शेतकरी मेळाव्यास पंचक्रोशीतील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## मेरी माटी मेरा देश कार्यक्रमांतर्गत अमृत कलशाची स्थापना

लातूर : राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित मेरी माटी मेरा देश कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयातील सर्व शिक्षक/ शिक्षकेतर सहकारी व विद्यार्थ्यांकडून कलशात मूठभर माती जमा करण्यात आली. तसेच माती हातात घेऊन सेल्फी काढण्यात आले. याप्रसंगी अमृत कलशाची स्थापना करण्यात आली होती.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अमृत कलशात माती टाकून करण्यात आले. उद्घाटक म्हणून अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रसिद्ध कार्यकर्ते बाबा हलकुडे, सुधीर भोसले होते.



सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी कलशात माती टाकतांना सेल्फी काढण्यात आली.अमृत कलशात संकलित झालेल्या मातीतून ७५ रोपांची अमृत वाटिका करण्यात येणार आहे व एक कलश तालुक्यातील एका महाविद्यालयात जमा करण्यात येणार आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. देशमुख जी.एस., डॉ.बाळु कांबळे, डॉ. मेकेवाड व्ही. बी., डॉ.मलवाडे व्ही.ए.,डॉ. शितोळे पी.डी.,प्रा.मोहाळे एस.बी., डॉ.बनसोडे के.डी.व महाविद्यालयातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ सहकारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# नव संकल्पनांना मूर्त स्वरूप देऊन विद्यार्थ्यांनी उद्योगशिल बनावे-वेदांत पाटील

लातूर : विद्यार्थ्यांच्या मनातील सुप्त कल्पना प्रत्यक्षात उतरवण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन जीवन अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षक विद्यार्थ्यांच्या कल्पनांना वास्तवात आणण्याचे कार्य करीत असतात. नव संकल्पनांना मूर्त स्वरूप देऊन विदयार्थ्यानी उदयोगशिल बनावे असे आवाहन जिल्हा कौशल्य,विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शक वेदांत पाटील यांनी केले.

लातूर : दयानंद वाणिज्य महाविद्यालया अंतर्गत इंक्युबॅशन अँड इनोवेशन सेल व जिल्हा कौशल्य,विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य .डॉ. गणेश लहाने,तर व्यासपीठावर आयक्यूएसी समन्वयक डॉ.बालाजी कांबळे, व इनक्युबॅशन व इनोव्हेशन विभागाच्या प्रभारी डॉ. आकांक्षा भांजी यांची उपस्थिती होती.

पाटील पुढे म्हणाले, महाराष्ट्र स्टुडंट्स इनोव्हेशन चॅलेंज २०२३ या स्पर्धेत सहभागी झालेल्या व सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यवसाय संदर्भातील कल्पना आवश्यक मांडणी व सादरीकरणासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्र्वासन त्यांनी दिले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने यांनी घरच्या जबाबदारीला अनुसरून कमीत कमी भांडवलात उद्योग निर्माण करावा पण त्या अगोदर विद्यार्थ्यांनी आधी स्वतःमधील कौशल्य ओळखणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी डॉ.बालाजी कांबळे यांनी विद्यार्थाना मार्गदर्शन केले. डॉ. आकांक्षा भाजी यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाची रूपरेखा तसेच महाविद्यालयीन स्तरावर स्टुडन्ट इनोवेशन चॅलेंज स्पर्धेच्या आयोजना संदर्भातील माहिती स्पष्ट केली. सूत्रसंचालन प्रा.पूजा भोसले, पाहुण्यांचा परिचय प्रा.राम पांचाळ तर आभार प्रदर्शन प्रा.अजय चव्हाण यांनी केले. याप्रसंगी ग्रंथपाल विठ्ठल जाधव, डॉ.सारिका दायमा, डॉ. निखिल व्यास, प्रा.गीतांजली जोशी, प्रा सोनाली जाधव, प्रा.प्रसाद पाटील, प्रा.माहेश्र्वरी पटणे, प्रा.अनुजा कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना करिता इंक्युबॅशन व इनोव्हेशन सेलच्या प्रमुख डॉ. मनिषा अष्टेकर, डॉ. आकांक्षा भांजी व सर्व समिती सदस्य, सेवक बालाजी कनगुळे, अमोल हणमंते यांनी परिश्रम घेतले.

## विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिकांचे कार्य आचरणात आणावे-बोरसे

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.२१ सप्टेंबर २०२३ रोजी जैवतंत्रज्ञान विभागातील जैवतंत्रज्ञान मंचच्या वतीने वैज्ञानिक ' चार्ल्स निकोल ' यांची १५७ वी जयंती साजरी करण्यात आली.तसेच झिरो इमिशन दिवसही विभागातर्फे साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात मनोजकुमार बोरसे (वरिष्ठ खाते व्यवस्थापक,हिमीडिया लॅबोरेटरी, ठाणे) आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड सर यांनी वैज्ञानिकांना पुष्प अर्पण करून केली.कार्यक्रमाची प्रस्तावना जैवतंत्रज्ञान विद्यार्थी मंचचे अध्यक्ष चिन्मय कांबळे,बी.एस्सी.तृतीय वर्ष यांनी केली.वैज्ञानिकांबद्दल जैवतंत्रज्ञान विभागातील प्रा.स्वरूप गावकरे यांनी माहिती सांगितली.बी.एस्सी.द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी श्रुती गंगाथडे व मेघा कदम यांनी भित्तिपत्रकाद्वारे ' झीरो एमिशन दिवस २०२३ ' दर्शविला व त्या पत्रकाविषयी चांगल्या प्रकारे माहिती दिली.

**CHANGE IN NAME**

I have change my name from MEHROZ KAZIMODDIN PATEL to MEHROZ AHSAN MONIS SAYYED SHAH henceforth this declaration and will be known by this name I will use MEHROZ AHSAN MONIS SAYYED SHAH. In future the same name will be used by my husband/wife, children and family.

**OLD NAME : MEHROZ KAZIMODDIN PATEL**
**NEW NAME : MEHROZ AHSAN MONIS SAYYED SHAH**
**ADDRESS :** ASADIQBAL KHORIWALE, 7691, ALAMPURA, INDIA NAGAR LATUR - 413512

**जाहीर प्रगटन**

या प्रगटनाद्वारे जाहीर करण्यात येते की, माझ्या जुन्या पासपोर्टवर माझे नाव **SHAIKH JAIBUNISA MUSASAB** असे असून माझ्या इतर कागदोपत्रीवर माझे नाव **SHAIKH JEBUNABI MUSAMIYAN** असे आहे. या पुढील माझ्या खाजगी व कायदेशीर व्यवहारात माझे हेच नविन नाव **SHAIKH JEBUNABI MUSAMIYAN** वापरात घेईन याची संबंधितानी नोंद घ्यावी.
सबब हे जाहीर प्रगटन

**OLD NAME : SHAIKH JAIBUNISA MUSASAB**
**NEW NAME : SHAIKH JEBUNABI MUSAMIYAN**
**ADDRESS :** ४७०८, वीर हणमंतवाडी, लातूर - ४१३५१२

**जाहीर प्रगटन**

या प्रगटनाद्वारे जाहीर करण्यात येते की, माझ्या जुन्या पासपोर्टवर माझे नाव **SHAIKH SHAMSHADBEGUM LAYAKPASHA** असे असून माझ्या इतर कागदोपत्रीवर माझे नाव **SHAIKH SHAMASHADBI LAYAKMIYA** असे आहे. या पुढील माझ्या खाजगी व कायदेशीर व्यवहारात माझे हेच नविन नाव **SHAIKH SHAMASHADBI LAYAKMIYA** वापरात घेईन याची संबंधितानी नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन

**OLD NAME : SHAIKH SHAMSHADBEGUM LAYAKPASHA**
**NEW NAME : SHAIKH SHAMASHADBI LAYAKMIYA**
**ADDRESS :** ४७०८, वीर हणमंतवाडी, लातूर - ४१३५१२

**जाहीर प्रगटन**

या प्रगटनाद्वारे जाहीर करण्यात येते की, माझ्या जुन्या पासपोर्टवर माझे नाव **SHAIKH LAYAKPASHA MUSAMIYA** असे असून माझ्या इतर कागदोपत्रीवर माझे नाव **SHAIKH LAYAK MUSAMIYA** असे आहे. या पुढील माझ्या खाजगी व कायदेशीर व्यवहारात माझे हेच नविन नाव **SHAIKH LAYAK MUSAMIYA** वापरात घेईन याची संबंधितानी नोंद घ्यावी.
सबब हे जाहीर प्रगटन

**OLD NAME : SHAIKH LAYAKPASHA MUSAMIYA**
**NEW NAME : SHAIKH LAYAK MUSAMIYA**
**ADDRESS :** प्रतिभा शाळेसमोर, वीर हणमंतवाडी, लातूर - ४१३५१२

**समता नागरी सहकारी पतसंस्था, मर्यादित, लातूर**
प्रशासकीय कार्यालय, पुर्णानंद मंगल कार्यालयासमोर, सावेवाडी, लातूर-४१३५१२

**वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस**
(फक्त सभासदांसाठी)

समता नागरी सहकारी पतसंस्था म. लातूर ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३०.०९.२०२३ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थेचे चेअरमन श्री. प्रमोद जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पुर्णानंद मंगल कार्यालय, सावेवाडी, लातूर येथे खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी बोलाविण्यात आलेली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय :-**
१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) साल सन २०२२-२०२३ च्या तेरीज, नफा-तोटा, ताळेबंद पत्रकांना मान्यता देणे.
३) साल सन २०२३-२०२४ सालासाठीच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
४) पुढील वर्षासाठी ऑडीटरची नेमणूक करणे.
५) कमी शेअर्स भरणा केलेले सभासदांचे शेअर्स गंगाजळी खाते जमा करणे व केलेल्या कार्याची नोंद घेणे.
६) ऐन वेळचा विषयाच्या मा. अध्यक्षांस परवानगीने मंजुरी देणे.

**दिनांक : ३०.०९.२०२३** **वारः शनिवार**
**वेळ : दुपारी २.०० वा.** **स्थळ : पुर्णानंद मंगल कार्यालय, सावेवाडी, लातूर**

स्वाक्षरीत/-
**सचिव अशोक गोविंदपूरकर**
(मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून)

**सुचना :**
१) गणसंख्या अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याचवेळी सभा घेतली जाईल व अशा सभेस गणपुर्तीची आवश्यकता भासणार नाही.
२) ज्या सभासदांना सूचना अथवा माहितीवजा प्रश्न विचारावयाचे असेल तर त्यांनी आपले लेखी प्रश्न सभेच्या कार्यालयात दि. २५.०९.२०२३ अखेरपर्यंत पोहचतील अशा पद्धतीने पाठवावेत.
३) या सभेस प्रत्येक सभासद संस्थेचा एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल, संस्थेने अधिकृत केलेल्या प्रतिनिधीच्या ठरावाची प्रत सोबत आणावी.
४) ज्यांना शेअर्स सर्टिफिकेट मिळाले नसल्यास ती त्यांना सभेनंतर देण्याची व्यवस्था केलेली आहे.

छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक, निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३, मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते